# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई-४००
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४०
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ १११८ दिनांक: १५ ऑक्टोबर, २००५

**परिपत्रक क्र. १०६**

**विषय:** उद्‌भव विहिरीच्या खोदकामाबाबत..

स्वीकृत निविदेत उद्‌भव विहिरीच्या कामांतर्गत जितक्या खोलीपर्यंत खोदाई अभिप्रेत असते तितक्या खोलीसाठी मऊ व कठीण स्तरावरील खोदाईच्या १.५ मीटर अंतराच्या लिफ्ट असतात. जमिनीपासून खाली खोदाई करताना प्रथम मऊ स्तरातील व त्यानंतर कठीण स्तरातील खोदाई अपेक्षित केलेली असते. यामध्ये मऊ व कठीण स्तरातील खोदाईसाठी पायाभूत दर (Basic Rate) गृहित धरुन प्रत्येक १.५ मीटर खोलीच्या लिफ्टसाठी ठराविक दर मिळवून त्या त्या लिफ्टचा दर दिलेला असतो व त्यानुसार खोद कामाची अदायगी करावयाची असते. यासंदर्भात खालील नमूद केलेल्या परिस्थितीत अतिरिक्त बाबीचे प्रस्ताव करण्यात येतात असे निदर्शनास आले आहे.

अ) समजा ९ मीटर खोलीपर्यंत मऊ स्तरातील खोदाई अपेक्षित असताना प्रत्यक्ष कामाच्या वेळी ४.५ मीटर खोलीपर्यंतच मऊ स्तर व तेथून खाली कठीण स्तर लागल्यास ४.५ ते ९ मीटर खोलीसाठी कठीण स्तराच्या खोदाईची बाब स्वीकृत निविदेत नाही या सबबीवर तेवढया कठीण स्तरावरील खोदाईची अतिरिक्त बाब करण्यात येते.

ब) समजा ९ मीटर खोलीपर्यंत मऊ स्तरातील खोदाई अपेक्षित असताना प्रत्यक्ष कामाच्या वेळी १२ मीटर खोलीवर मऊ स्तर लागल्यास ९ ते १२ मीटर खोलीसाठी मऊ स्तरातील खोदाईची बाब स्वीकृत निविदेत नाही, या सबबीवर तेवढया मऊ स्तरावरील खोदाईची अतिरिक्त बाब करण्यात येते.

क) समजा उद्‌भव विहिरीची खोली १५ मीटर करावयाची असताना ती १८ मीटर करावी लागली तर वाढीव खोदाईची बाब स्वीकृत निविदेत नाही या सबबीवर वाढीव खोदाईची अतिरिक्त बाब करण्यात येते.

स्वीकृत निविदेत एखाद्या विशिष्ट कामाची बाब समाविष्ठ नसेल तर ते काम अतिरिक्त बाबीव्दारे करणे अभिप्रेत असते. परंतु, वरील उदाहरणात असे दिसते की, **मऊ व कठीण स्तरातील कामाच्या बाबी समाविष्ठ असूनही केवळ खोदाईचा स्तर बदलला म्हणून त्या लिफ्टच्या खोदाईची स्वतंत्र बाब गृहीत धरुन अतिरिक्त बाब करण्यात येते ; हा समज व त्यावर आधारित वरील पध्दत चुकीची व प्राधिकरणाच्या नुकसानीची आहे.** तेव्हा या संदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) स्वीकृत निविदेत खोदाईची बाब समाविष्ठ असल्यास केवळ बदललेल्या भूस्तरातील खोदकामाकरिता अतिरिक्त बाब करु नये. बदललेल्या भूस्तरातील खोदकामाची अदायगी लिफ्टमधील दर फरकानुसार (कमी / जास्त) करावी. खंड-३८ मधील परिमाणे यानुसारच परंतु तत्कालीन दरसूचीच्या दराने अदा करावीत.

२) क्र. १ मध्ये नमूद केलेली अदायगी पध्दत चालू निविदेतील कामासाठी (Tender in Force) व नवीन निविदांसाठीसुध्दा लागू राहील.

३) नवीन निविदांमध्ये उद्‌भव विहिरीच्या खोदाई कामासाठी क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अट न चुकता अंतर्भूत करावी.

(दीपक भसाळे )
सदस्य सचिव

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.
२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
३) सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा .मंडळ.
४) सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., बांधकाम / प्रकल्प विभाग.

Oct-05/45